Set-A

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## कमला कॉलेज, कोल्हापूर

B.A. Part- I (Sem – II) (CBCS)

**Subject Name:** **मराठी** (Marathi) **अक्षरबंध**

**Sub Code:** 71262 (DSC-A13)

**Day and Date:** Thursday, 23/06/2022 Total Marks : 50

**Time:** 10.30 to 1.00

कमला कॉलेज, कोल्हापूर ग्रंथालय क्रांतिवीर संतराव पाटील ग्रंथालय

**प्र.१. योग्य पर्याय निवडा** **(१०)**

१) जीवाचा आटापिटा या कवितेमधील नायकाच्या मोठया मुलाचे नाव काय आहे ?

अ) मुक्तछंद ब) निसर्ग क) भीम ड) समुद्र

२) जीवाचा आटापिटा या कवितेमधील नायक आपल्याला नोकरी कोणत्या कोट्यातून मिळाली असं सांगतो?

अ) खेळाडूच्या ब) दिव्यांगाच्या क) धरणग्रस्तांच्या ड) कलावंताच्या

३) गाव खेड्याची संवेदना कवीला कुठं दिसून येत नाही?

अ) शहर ब) बागेत क) रेल्वेत ड) विमानात

४) सरकारला कोणत्या गोष्टीकडं लक्ष द्यायला वेळ नाही असं कवी म्हणतो !

अ) बालमृत्यूकडं ब) निसर्गाकडे क) दहशतवादाकडं ड) महापुराकडं

५) लग्नाच्या धामधुमीत कुणी प्राण सोडला?

अ) आमदारानं ब) वासंतीआजीनं क) मामीनं ड) मामानं

६) भ्रष्टाचारी व्यक्तीची सर्व दु:खे कोठे उभी राहतील असं ज्योतिषी सांगतो?

अ) शहराच्या सीमारेषेवर ब) नदीकाठावर क) समुद्रकाठावर ड) शेतामध्ये

७) मैत्रीचा अकाली मृत्यू कुठे होतो असं कवी म्हणतो ?

अ) शहरात ब) खेड्यात क) विदेशात ड) शासकीय कार्यालयात

८) पर्सनल मुलाखतीच्यावेळी कोणता मुद्दा कळीचा ठरला?

अ) जेवणाचा ब) जातधर्म क) पैशाचा ड) नात्याचा

९) समाजाच्या मेंदू मध्ये कोण कथकली नृत्य करीत आहे असं कवी म्हणतो?

अ) धर्म ब) बेकारी क) भांडवलशाही ड) मैत्री

१०) कवी बेकारीसाठी कोणतं विशेषण वापरतो?

अ) स्मार्ट ब) ग्लोबल क) सुखवस्तु ड) दगाबाज

**प्र.२.** अ) कवी लोकनाथ यशवंत यांनी आपल्या कवितांच्या मधून जातीयवादी प्रवृत्तीचा समाचार कसा घेतला आहे? (१०)

किंवा

ब) बेगडी कृत्रिम जीवन पद्धतीवर कवी लोकनाथ यशवंत यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून कसे भाष्य केले आहे?

**प्र.३.** अ) १९८० नंतरच्या भारतीय समाजातील पडझडीचे वर्णन लोकनाथ यशवंत यांनी कसे केले आहे ? (१०)

किंवा

ब) लोकांच्या भावनाशी खेळणाऱ्या भविष्यकर्त्यांचे चित्रण 'भविष्य' या कवितेत कसे रेखाटले आहे?

**प्र.४ .** थोडक्यात उत्तरे लिहा (तीन पैकी दोन) (१०)

अ) माणसाच्या संकुचितपणाचे दर्शन 'एक वृक्षाची गोष्ट' या कवितेमधून कसे घडते ते सांगा!

ब) 'जन्म आईचा' या कवितेतून लोकनाथ यशवंत यांनी मातृप्रेमाचा गौरव कसा केला आहे?

क) 'हे जीवन सुंदर आहे' या कविते मधून नातेसंबंध अडगळीत ठेवण्याच्या वृत्तीचे दर्शन कसे घडते?

कमला कॉलेज, कोल्हापूर ग्रंथालय क्रांतिवीर सं...वदादा पाटील ग्रंथालय

**प्र.५.** उपयोजित मराठी (तीन पैकी दोन) (१०)

अ) बातमी लिहिताना बातमीलेखकाने कोणती काळजी घ्यावी ते सांगा.

ब) आपला अभ्यास कसा चालला आहे हे थोडक्यात पत्राने आपल्या मैत्रिणीस कळवा.

क) 'रस्त्यावर कचरा टाकू नका' या आशयाचे वाचकांच्या पत्रव्यवहारासाठीचे पत्र लिहा.